सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
THANE RURAL POLICE
ठाणे ग्रामीण पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे ग्रामीण**
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचे कार्यालय
खारकर अळी, कोर्टनाका, ठाणे (प.)
फोन नंबर ०२२-२५३४३५६७

E-mail : sp.thane.r@mahapollice.gov.in

**ठाणे ग्रामीण प्रेसनोट, दिनांक : २२.१२.२०२०**

**भिवंडी-पिसे रोडवर सावद जवळ १ ,१३,७९,००० रु ची ब्राऊन शुगर व एम डी पावडर असा मुददेमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.**

मा.पोलीस अधीक्षक सो. ठाणे ग्रामीण यांनी गणेशपुरी-मुरबाड उप विभागामध्ये गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरणेबाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री सुरेश मनोरे याच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/सुनील जाधव व सपोनि/भास्कर जाधव याचे पोलीस पथक नेमण्यात आलेले होते. दिनांक २१/१२/२०२० रोजी गणेशपुरी-मुरबाड उप विभागामध्ये गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असतांना, पडघा पोलीस ठाणेच्या हददीतील सावद नाका वरुन पिसा डॅम दिशेने जाणा-या रोडवर दोन इसम रोडच्या बाजुस पार्कीग केलेल्या एक चारचाकी गाडीमध्ये संशयास्पद बसलेले दिसून आले. त्या दोघांच्या संशयास्पद हालचाली दिसुन आल्या, त्यामुळे सदर इसमांना पळुन जाण्याची संधी न देता जागीच गाडीसह अटकाव करुन ताब्यात घेवुन त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नावे अनुक्रमे १) जाहीद मोहम्मंद हनीफ शेख, वय ३० वर्ष, रा. बी/४०४, हावरे पिनॅकल, मुठवल गांव, ता. भिंवडी, जि. ठाणे २) इश्वर रघुवीर मिश्रा, वय. ३९ वर्ष, रा. मु. मडवानगर-खिरीघाट, मिश्रोरिया, खीरीचाट, बस्ती, उत्तरप्रदेश असे सांगीतले. त्यानंतर त्यांचे ताब्यात असलेली इनोव्हा कार नं. एमएच-०२-एएल-८४६ हिची झडती घेतली असता तिचे पाठीमागील डिकीत एक प्लास्टीकचा डब्बा व एक प्लास्टीकची पिशवी असे दिसुन आले. ती उघडुन पाहता तिचेमध्ये मानवी शरीरावर परिणाम करणारा ब्राऊन शुगर पावडर १ किलो ७० ग्रॅम वजनाची व एम. डी. (मेफेड्रॉन) पावडर १ किलो ७०० ग्रॅम असा अंमली पदार्थ तसेच एक डिजीटल वजन काटा असा एकुण रु. १,१३,७९,५००/- चा माल मिळुन आलेला. सदरबाबत पोउनि/ गणपत सुळे यांनी पडघा पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (क) अन्वये फिर्याद दिलेली आहे. दोन्ही आरोपीताना अटक करण्यात आलेली असुन त्यांनी गुन्हयाची कबुली दिलेली आहे.

श्री विक्रम देशमाने, मा. पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण, श्रीमती स्मिता पाटील, मा. अपर पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण, श्री दिलीप गोडबोले, उपविभागीय पोलीस अधिकारी, गणेशपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सुरेश मनोरे पोलीस निरीक्षक, सपोनि सुनिल जाधव, सपोनि भास्कर जाधव, पोउनि/गणपत सुळे, सफौ/सी. डी. पोशिरकर, पोहवा/२२०१ चौधरी, पोहवा/२७२७ राणे, पोना/४८८ सोनावणे, पोना/१५४२ ठाकरे, पोना/२७६ गायकर, पोना/२५४७ संकपाळ, पोना/७७९ कोळी, पोना/२५४५ कदम, पोशि/२०४५ रॉय यांनी सदरची कामगिरी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सुनिल जाधव हे करीत आहेत.

Scanned by CamScanner